Reg. No. KPR/BNK/114 Dt. 17/08/1964
RBI. LIC. No. UBD. MH. 409 P. Dt. 16/10/1984

APRS BANK

# आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लिमिटेड, रेंदाळ

● प्रधान कार्यालय : मेन रोड, विठ्ठल मंदीर पहिला मजला, रेंदाळ
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर पिन : ४१६२०३
● E-mail : rendalbank@sancharnet.in ● Web. : www.aprsbank.com ● Phone : (0230) 2450123, 2451370

जावक क्रं. HO/ 59/2022-2023/404 दिनांक 15/11/2022

प्रति,
भागीदार,
बालाजी डेब्ट रिकव्हरी एजन्सी , कोल्हापूर,
1117, ई वॉर्ड मिठारी बिल्डींग पाच बंगल्यासमोर, कोल्हापूर 416 001
ईमेल - balajirecovery@yahoo.in Web- www,recoverybalaji.com

विषय – बँकेच्या सुचीमध्ये (Empanelment) वसुली प्रतिनिधी म्हणून नियुक्त केलेबाबत.
संदर्भ - आपले दिनांक 29/10/2022 इ.रोजीचे पत्र.

महाशय,

आपले संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणास कळविणेत येते कि, बँकेच्या मा. संचालक मंडळ सभा दिनांक 11/11/2022 ठराव क्रं. 10 नुसार आपल्या बालाजी डेब्ट रिकव्हरी एजन्सी , कोल्हापूर या भागिदारी फर्मची बँकेकडील अनुत्पादक व थकित कर्जदारांकडील थकबाकी / कर्जबाकी सिक्युरिटायझेशन कायद्यांतर्गत वसुलीसाठी प्रतिनिधी (एजन्सी) म्हणून नियुक्ती करणेस मान्यता /मंजुरी दिलेली असुन आपले नांव बँकेच्या सुचीमध्ये (Empanelment) वसुली प्रतिनिधी (एजन्सी) म्हणून समाविष्ठ करणेत येत आहे. पुढीलप्रमाणे चार्जेस व कमिशन आपणास आदा करणेससुध्दा मंजुरी देणेत आलेली आहे.

| अ.नं. | तपशिल | चार्जेस | बँकने प्रत्यक्ष करावयाचा खर्च |
|---|---|---|---|
| 1 | थकबाकी / अनुत्पादक कर्जदार यास 13(2) अंतर्गत नोटीस बजावलेस | रु. 1000/- | नोटीस पोष्टेज खर्च |
| 2 | थकबाकी / अनुत्पादक कर्जदार यास 13(4) अंतर्गत नोटीस बजावलेस | रु. 1000/- | नोटीस पोष्टेज खर्च |
| 3 | प्रतिकात्मक ताबा (Symbolic) | रु. 10000/- | पोलिस बंदोबस्त, ताबा नोटीस लागू करणे, ताबा घेतलेनंतर वर्तमानपत्रात नोटीस प्रसिध्द करणे व बँकेचे उपस्थित अधिकारी ,कर्मचारी यांचा होणारा प्रत्यक्ष खर्च. |
| 4 | प्रत्यक्ष ताबा घेणेसाठी मा. जिल्हाधिकारी व मा. कोर्ट यांचे कडे प्रस्ताव सादर करणे, आदेश पारीत करुन घेणे व प्रत्यक्ष ताबा घेणे (Physical) | रु. 20000/- | पोलिस बंदोबस्त, ताबा नोटीस लागू करणे, ताबा घेतलेनंतर वर्तमानपत्रात नोटीस प्रसिध्द करणे व बँकेचे उपस्थित अधिकारी ,कर्मचारी यांचा होणारा प्रत्यक्ष खर्च. |
| 5 | वसुली कमिशन | वसुली रकमेच्या 5 टक्के | 1) प्रत्यक्ष ज्या टप्प्यावर सदर अनुत्पादक कर्जाची वसुली पूर्ण होऊन खाते उत्पादक झालेस त्या रकमेवर<br>2) ज्या टप्प्यावर सदर अनुत्पादक कर्जाची वसुली पूर्ण होणार तदनंतर त्या टप्प्याचे चार्जेस आदा करणेचे नाहीत.<br>3) बँकेने अनुत्पादक कर्जदारास ओटीएस चा लाभ दिलेस ओटीएस रकमेवर कमिशन निश्चित करणेचा आहे.<br>4) अनुत्पादक कर्ज वर्गवारीतील ज्या कर्जदाराचे वसुलीसाठी एजन्सीकडे काम सोपविले आहे. अशा कर्जादाराची एकापेक्षा अनेक खाती असतील व ती सर्व अनुत्पादक झाली असतील तर कोणत्याही खात्याला एजन्सीचे प्रयत्नामुळे झालेला वसुल जमा केलेस सदर रक्कम कमिशनला पात्र होईल. |

बँकेकडील अधिकारी व आपण यांचेत झालेल्या चर्चेनुसार आपण रु. 200 चे स्टॅम्प पेपरवर करार करुन देणेचा आहे. कराराचा मसुदा सोवत जोडलेला आहे.

बँकेच्या वसुली विभागाकडील, श्री के.एस.माळी, विभागप्रमुख तसेच प्राधिकृत अधिकारी श्री ए.डी. रेंदाळे यांचेकडून सिक्युरिटायझेशन कायद्यांतर्गत कारवाई केलेल्या व करावयाचे अनुत्पादक / थकित खातेदारांची माहिती व कागदपत्रे घेऊन आपल्या कामकाजास सुरुवात करावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी चेअरमन

प्रत माहितीसाठी सविनय सादर 1) मा. व्हा. चेअरमनसो
प्रत माहितीसाठी 1) विभागप्रमुख, सर्व विभाग, मुख्य कार्यालय 2) प्राधिकृत अधिकारी, श्री ए.डी. रेंदाळे -

Abasaheb Patil Rendal ... Rendal.